**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७ /उद्योग-६.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५ जानेवारी,२०२१.

<u>वाचा</u> : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५)
२) शासन निर्णय समक्रमांक दि.२३ जुलै,२०१५
३) शासन निर्णय समक्रमांक दि.११ सप्टेंबर,२०१८
४) तांत्रिक सल्लागार तथा नोडल अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांचे जा. क्र. मऔविम/तांस/ डी-१७३९२/२०२० दि.०३ डिसेंबर, २०२० चे पत्र.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तप्तर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, दि.२८.४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम - ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितिय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करून त्याप्रमाणे सेवा पुरवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. या विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासननिर्णयान्वये विभागामार्फत १९ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून,संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या दि.२३ जुलै,२०१५ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांपैकी ३ सेवा वगळण्यात आलेल्या आहेत.. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी त्यांच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये अतिरिक्त २ सेवा अधिसुचित करण्याची शासनास विनंती केलेली आहे. त्यामुळे या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ नुसार अधिसूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाच्या सहपत्र - अ मध्ये नमुद करण्यात आलेल्या २ सेवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ मधील कलम - ३ नुसार अधिसुचित करावयाच्या आहेत.

२. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहील. तसेच संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सेवा विचारात घेवून पदनिर्देशित अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी , द्वितिय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये सुधारणा करता येईल.

३. तांत्रिक सल्लागार तथा नोडल अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे कलम - ३ अनुसार अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०१०६१५५५२५४११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: CN = SANJAY SHANKARRAO INGLE, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Date: 2021.01.06 15:59:17 +05'30'

**( संजय इंगळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१.मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२.मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३.मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
४.मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६.सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
७.मा.लोक-आयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
८.मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
९.विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१०मा.मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी.
११प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
१२निवड नस्ती (उद्योग-६).

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.मलोह-२०१५/ प्र.क्र.७७/उद्योग - ६, दि. ०५.१.२०२१ चे सहपत्र.**

**सहपत्र - "अ"**

**( महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई , यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल )**

| क्र. | सेवेचे नाव | कालावधी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी | द्वितीय अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ अ | ऑनलाईन सरळ पद्धतीने अथवा प्राधान्याने भुखंड वाटप करताना समितीच्या मंजुरीनंतर जागेचे देकारपत्र (offer letter) देणे. | २ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| ब | ऑनलाईन निविदा पध्दतीने भुखंडाचे वाटप करताना निविदा उघडणाऱ्या समितीच्या अहवालास मा. मुख्य कार्यकारी यांची मंजुरी प्राप्त अहवाल प्रा.अ. यांना प्राप्त झाल्यावर | २ दिवस वस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |
| २. | भुखंडाचे वाटप (Allotment letter) पत्र देणे | इसारा रक्कम भरल्यानंतर ७ दिवस | प्रादेशिक अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्यालय) |

- २ -

**The equivalent English translation of GR is given below:**

To notify public service designated officers, first and second appellate officers and prescribed time period under Maharashtra Right to Public Service Act, 2015.

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

### INDUSTRIES, ENERGY & LABOUR DEPARTMENT

**Government Resolution Number: MLH-2015/Pra.Kra.77/udyog-6**

Mantralaya, Mumbai 400032

Date: 05 January 2021

Read: 1) Maharashtra Right to Public Service Act 2015 (Maharashtra Act No.5 of 2015).

2) Government Resolution of even number dt. 23rd July 2015

3) Government Resolution of even number dt. 11th September 2018.

4) Letter of Technical Consultant & Nodal Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Mumbai, bearing Out. No. MIDC/Tas/D-17392/2020 dt. 3rd December 2020.

**INTRODUCTION:**

With an objective to offer transparent, effective and timely public services to the eligible persons in the State and also taking into consideration the increasing expectations from the public as well as from local administration, Maharashtra Right to Public Service Act 2015 dt. 28.4.2015 has come into force with a view to provide prompt and quality services. As mentioned in Section-3 of this Act, it has been made mandatory for every public authority to notify the public services that they are providing during 3 months period from enforcement of the Act and from time to time thereafter, designated officers, first and second appellate

authorities and the prescribed time period, and to provide the services accordingly.

2. This Department, vide Government decision at Ref.no.2 above, has notified 19 services and as per the Government decision at Ref.No.3 above, 3 service notified vide Government decision of Industries Directorate dt. 23rd July 2015, have been deleted. Maharashtra Industrial Development Corporation, Mumbai, have made a request to the Government to notify additional 2 services, vide their letter at Ref.No.4 above. Therefore, the matter of notifying these services under Sec. 3 of Maharashtra Right to Public Service Act 2015, was under consideration of the Government. The decision in this connection taken by the Government is as follows:

**GOVERNMENT DECISION:**

2 services mentioned in Annexure-A to this Government decision are to be notified by Maharashtra Industrial Development Corporation, Mumbai as per Section-3 of Maharashtra Right to Public Service Act 2015.

2. The concerned public authorities will be free to decide the fees to be charged for providing the services under this Act. Further, the concerned public authorities can also make improvements in the designated officers, first appellate officers, second appellate officers etc. taking into consideration these services.

3. Technical consultants & Nodal Officers, Maharashtra Industrial Development Corporation, Mumbai may take suitable steps to implement the services notified under Section-3 as mentioned above.

4. This Government decision has been made available on the website of www.maharashtra.gov.in and its Computer Code Number is 202101061555254110. This order has been issued with digital signature.

SANJAY SHANKARRAO INGLE
Dy. Secretary, Government of Maharashtra

Copy to:

1. Principal Secretary to Hon'ble Governor
2. Principal Secretary to Hon'ble Chief Ministeer
3. Private Secretary to Hon'ble Minister (Industries)
4. Private Secretary to hon'ble Minister for State (Industries)
5. Private Secretary to all Ministers / Ministers for States.
6. All Assembly/Council members
7. Office of Hon'ble Lok-Ayukta and Upa Lokayukta, Mumbai.
8. Sr. Personal Assistant to Hon'ble Chief Secretary.
9. Development Commissioner (Industries), Industries Directorate, Mumbai.
10. Public Relation Officer of Hon'ble Chief Minister
11. Personal Assistant to the principal Secretary (Industries)
12. Selection File (Industries-6)